जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २५६ | बुधवार, १५ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

# पुणे–सोलापूर महामार्गावरील नायगाव व कुंजीरवाडीतील 'कोंडी'वर प्रशासनाचा हातोडा

## बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी यांच्या प्रयत्नांना यश; दोन जुने दुभाजक बंद

**उरुळी कांचन, ता. १४ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील कदमवाकवस्ती आणि कुंजीरवाडी परिसरातील वाहतूक कोंडीच्या जटील समस्येला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. 'पुणे प्राईम न्यूज'ने या प्रश्नाचा वारंवार आवाज उठवला होता. प्रशासनाने सोमवारी (ता. १३) प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली असून या नव्या नियोजनामुळे महामार्गावरील अपघातांचा धोका कमी होऊन प्रवाशांचा वेळ वाचणार आहे.

महामार्गावरील नायगाव चौक आणि फुरसुंगीकडे जाणारा चौक हे वाहतूक कोंडीचे प्रमुख केंद्र बनले होते. या ठिकाणी विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी वाहनांच्या मैलोन्मैल रांगा लागत असत. परिसरातील नर्सरी, सिमेंट पाईप कंपन्या आणि इतर उद्योगांमुळे होणारी अवजड वाहनांची रेलचेल कोंडीत भर घालत होती. ही समस्या सोडवण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी व उरुळी कांचनचे माजी सरपंच संतोष कांचन यांनी हडपसर वाहतूक पोलीस व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे (NHI) वारंवार पाठपुरावा केला होता.



वाहतूक शाखेच्या सूचनेनुसार, नायगाव फाटा आणि कुंजीरवाडी चौकातील सध्याचे दोन्ही धोकादायक दुभाजक (डिव्हायडर) कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहेत. त्याऐवजी वाहतूक सुरळीत करण्यासाठी तीन ठिकाणी नवीन डिव्हायडर तयार केले जाणार आहेत. त्यामध्ये कुंजीर लॉन्स समोर, मोरया वन सोसायटीसमोर, भारत बेंझ शोरूम (जुने) पतसंस्थे शेजारी अशा ठिकाणी हे नवीन डिव्हायडर सुरक्षिततेच्या सर्व निकषांनुसार तयार केले जाणार असून, वाहनांना वळण घेण्यासाठी (U-Turn) पुरेसा रस्ता उपलब्ध करून दिला जाणार आहे. यामुळे अपघातांचा धोका कमी होऊन वाहनांचा वेगही कायम राखता येणार आहे. हे नवीन दुभाजक 'यू-टर्न' (U-Turn) घेण्यासाठी पुरेसे प्रशस्त असून, त्यामुळे वाहनांना वळण घेताना होणारी कसरत थांबणार आहे.

दरम्यान, या मोहिमेत वाहतूक उपायुक्त हिंमत जाधव, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र करनकोट यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. नव्या दुभाजकांमुळे महामार्गावरील वाहनांचा वेग कायम राहील आणि अपघातांचे प्रमाण शून्यावर येईल, अशी आशा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. उरुळी कांचन पॅटर्नची चर्चा यापूर्वी उरुळी कांचन येथील गंभीर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी यशस्वी पाठपुरावा करून 'उरुळी कांचन पॅटर्न' राबवला होता.

त्याच धर्तीवर आता नायगाव आणि कुंजीरवाडीचा प्रश्न मार्गी लावला जात असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

> आळंदी म्हातोबा, नायगाव, पेठसह परिसरातील नागरिकांची नायगाव येथील दुभाजक बंद करण्याची मागणी खूप दिवसांपासून होती. त्यानुसार वरिष्ठांशी पत्रव्यवहार करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे (छक्ख) वारंवार पाठपुरावा सुरु ठेवला. त्यानुसार पोलीस अधिकारी व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी सदर ठिकाणी भेट देऊन पाहणी केली होती. त्या पाठपुराव्यानुसार दुभाजक बंद करण्यात आले आहेत.
> - **राजेंद्र करणकोट,** पोलीस निरीक्षक, हडपसर वाहतूक शाखा

> पुणे पोलीस वाहतूक उपायुक्त हिंमत जाधव, हडपसर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करून भेट घेतली होती. वारंवार पाठपुरावा सुरु ठेवला होता. त्यामुळे सोमवारी (ता. १३) वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी आदेश काढला व दोन ठिकाणावरील दुभाजक बंद करण्याचा श्रीगणेशा करण्यात आला.
> - **सुदर्शन चौधरी,** संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती हवेली


### संक्षिप्त

#### ...त्याचे श्रेय मोदींनी घेऊ नये : संजय राऊत

**मुंबई, ता. १४ :** महिला आरक्षण हा विरोधाचा विषयच नाही पण त्याचे श्रेय मोदींनी घेऊ नये, महिलांना अधिकार मिळाले पाहिजेत ही या महाराष्ट्राची पहिली भूमिका आहे. इतिहास घडवण्याचा ठेका भाजपने घेतलेला नाही, अशा शब्दात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी भाजपला फटकारले आहे. आमचा या धोरणाला पाठिंबा आहेच. पण ज्या पद्धतीने डिलीमीटेशन होणार आहे त्यावर चर्चा सुरू आहे. महिला आरक्षण हा विरोधाचा विषय नाही पण त्याचे श्रेय मोदींनी घेऊ नये. इतिहास घडवण्याचा ठेका भाजपने घेतलेला नाही. महिला आरक्षणाची मुहुर्तमेढ शरद पवारांनी रोवली आहे. ज्योतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू यांचा वारसा महिला आरक्षणासंदर्भात फार मोठा आहे. महिलांना अधिकार मिळाले पाहिजेत ही या महाराष्ट्राची पहिली भूमिका आहे. इतिहास घडवण्याचा ठेका जो भाजपचे लोकं घेऊन फिरतायत ते चुकीचे आहेत. हा आमचा आत्मा आहे, असे संजय राऊत म्हणाले.

## महाराष्ट्राला मिळणार २७ नवीन आमदार?; आयोगाकडून हालचालींना वेग

**मुंबई, ता. १४ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्याने आता विधानपरिषदेतील अनेक दिवसांपासून रिक्त असलेल्या जागांवर निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे येत्या तीन महिन्यांत महाराष्ट्राला तब्बल २७ नवे आमदार मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून निवडणूक आयोगाकडून यासाठी चाचपणी सुरू आहे.



राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून द्यायच्या १७ जागा गेल्या तीन वर्षांपासून रिक्त होत्या. संबंधित संस्थांमध्ये मतदारसंख्या उपलब्ध नसल्या मुळे या जागांवर निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. मात्र अलीकडेच नगरपालिका, महापालिका तसेच काही जिल्ह्यांतील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्याने परिस्थिती बदलली आहे.

दरम्यान, उर्वरित काही जिल्ह्यांमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे निवडणुका झालेल्या नसल्या तरी, ७५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार उपलब्ध असल्यास निवडणुका घेण्याचा नियम लागू होऊ शकतो. यासाठी निवडणूक आयोगाने संबंधित मतदारांची माहिती मागवली असून लवकरच या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. याशिवाय, विधानसभेतील सदस्यांमधून निवडून द्यायच्या ९ जागांची मुदत १७ मे रोजी संपत आहे. त्यामुळे या जागांसाठीही लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. सध्याच्या राजकीय समीकरणानुसार महायुतीला बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर काँग्रेस नेत्या प्रज्ञा सातव यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या एका जागेसाठी पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकूण २७ जागांसाठी निवडणुका होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

दरम्यान, या सर्व पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने हालचाली वेगात केल्या असून येत्या तीन महिन्यांत राज्याच्या राजकारणात मोठे बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

## लातूर येथे आयपीएल सट्टा प्रकरणी कारवाईत चार जणांना अटक

**लातूर, ता. १४ :** लातूर शहरातील अंबाजोगाई रोड परिसरात फोनद्वारे आयपीएलवर सट्टा खेळवण्यात येत असताना कारवाई करण्यात आली.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणात चारजणांना अटक केली आहे. १३ लाख ७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहरातील अंबेजोगाई रोड परिसरात आयपीएल क्रिकेट सामन्यावर सट्टा खेळत असताना पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तत्काळ सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. एका चारचाकी वाहनामध्ये बसून सट्टा चालविणाऱ्या चार जणांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले. यामध्ये सचीन प्रकाश वलसे (४७) रा. मयूरवन, अंबेजोगाई रोड, लातूर. किरणकुमार अर्जुन केंद्रे ( ४१) रा. कृपा सदन रोड, गणेश मेडिकल जवळ, लातूर.गंगाधर रामराव घाडगे (५१) वर्षे रा. होळी, ता. लोदगा, जि. लातूर.मनीष श्रीकांत पंचाक्षरी (३७) रा. खडक हनुमान, दयाराम रोड, लातूर यांचा समावेश आहे. विविध कंपन्यांचे मोबाईल फोन,एक लॅपटॉप, रोख रक्कम, सट्टा व्यवहाराच्या नोंदी, क्रेटा चारचाकी वाहन असा एकूण १३,७३,०९०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासादरम्यान आरोपी हे आयपीएल क्रिकेट सामन्यांवर सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स या सामन्यावर सट्टा घेत असल्याचे उघड झाले आहे. ते मोबाईल फोन व ऑनलाइन माध्यमांचा वापर करून ग्राहकांशी संपर्क ठेवत सट्टा व्यवहार करत होते.सदर प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करीत आहेत.

## पक्ष म्हणजे कुणाच्या बापाची जहागीर नाही : आमदार संतोष बांगर

### जनतेची कामे न करणाऱ्या मंत्र्यांना घरी पाठवा

**नांदेड, ता. १४ :** सत्ता आल्यानंतर आमचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही जणांना मंत्री केले मात्र काही मंत्र्यांच्या डोक्यात वारं गेलं आहे. आमदारांचे फोन उचलले जात नाही, काम करणं तर बाजुलाच उंटावरून शेळ्या हाकणाऱ्या मंत्र्यांना आता घरची वाट दाखवा, हा पक्ष म्हणजे त्यांच्या बापाची जहागीर नाही, अशी खदखद कळमनूरीचे आमदार संतोष बांगर यांनी व्यक्त केली आहे.



नांदेड, हिंगोली, परभणी या जिल्ह्यातील शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची व लोकप्रतिनिधींची संयुक्त बैठक नांदेड येथे पार पडली. या बैठकीला खासदार श्रीकांत शिंदे, मंत्री उदय सामंत, मंत्री गुलाबराव पाटील आदी उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी तक्रारीचा पाढाच मंत्र्यांसमोर वाचला. गेल्या सहा वर्षात नांदेड शहराला एक हजार कोटी रूपयांचा निधी मिळाला. महापालिकेच्या निवडणूकीत याचा फायदा होईल असे वाटले मात्र शहरातून केवळ चार नगरसेवक निवडून आले. कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले जात नाही, भाजपाला पाठिंबा देताना कार्यकर्त्यांशी संवाद साधला नाही, पक्ष अशोक चव्हाणांच्या दावणीला बांधला गेला की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. स्थानिक आमदार कार्यकर्त्यांना विश्वासात घेत नाहीत, त्यांची कामे करत नाहीत असा आरोप अनेकांनी केला.

या बैठकीत कळमनूरीचे आमदार संतोष बांगर यांचा पारा फारच भडकला. संतापलेल्या बांगर यांनी एकनाथ शिंदे यांच्या मुळे अनेकजण राज्यात मंत्री झाले. मात्र ते मंत्री आमचे काम करणेच सोडा उलट आमचे फोन ही घेत नाही, असे मंत्र्यांसमोरच सुनावले. पुढे ते म्हणाले की, या मायबाप जनतेने तुम्हाला विश्वासाने निवडून दिले. काही मंत्री जर उंटावरून शेळ्या हाकत असतील तर अशा मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवल्याशिवाय पर्याय नाही, यांच्या डोक्यामध्ये वारं गेलं आहे आता त्यांना घरचा रस्ता दाखवलाच पाहिजे नाही तर जनता तुम्हाला माफ करणार नाही असा इशाराच त्यांनी यावेळी दिला.

## ज्येष्ठ पत्रकार प्रकाश भोईटे यांचे निधन

**पुणे, ता. १४ :** ज्येष्ठ पत्रकार प्रकाश ज्ञानेश्वर भोईटे (वय-६२, रा. कोथळे, ता. पुरंदर) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी (ता.१३) पुण्यात निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रासह शेतकरी चळवळीमध्येही शोककळा पसरली आहे. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, वडील आणि तीन भाऊ, भावजय आणि पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (ता. १३) रात्री ९ वाजता कोथळे (ता. पुरंदर) येथे कऱ्हा नदीकाठी अंत्यसंस्कार करण्यात आले.



भोईटे यांनी प्रभावी वार्तांकन केले. सध्या ते दैनिक केसरीमध्ये कार्यरत होते. राजकीय घडामोडींवर त्यांच्या अचूक व अभ्यासू बातम्यांमुळे त्यांनी पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली होती. शेतकरी प्रश्नांबाबत ते नेहमीच आक्रमक व भूमिका स्पष्ट मांडणारे पत्रकार म्हणून ओळखले जात. शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळला होता. शेतकरी आणि पत्रकारांच्या प्रश्नांसाठी झालेल्या विविध आंदोलनांत त्यांनी अग्रभागी भूमिका बजावली. महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे महासचिव,राज्य पत्रकार अधिस्वीकृती समिती सदस्य म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय काम केले. दरम्यान, पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी कायदा व्हावा यासाठी त्यांनी सातत्याने लढा दिला. कृषि,सहकार व साखर क्षेत्रातील त्यांच्या निर्भीड बातम्यांनी राज्यभरात चर्चाही निर्माण केली होती. जेजुरी देवस्थानचे माजी अध्यक्ष ॲड. धनंजय भोईटे, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय भोईटे आणि पत्रकार प्रताप भोईटे हे त्यांचे बंधू होत.

## शिरूर पोलीस ठाण्यासमोरच दोन गटात दगडफेक अन् हाणामारी; ४० ते ५० जणांच्या टोळक्यावर गुन्हा दाखल

**अक्षय टेमगिरे**

शिरूर, ता. १४ : शिरूर कायद्याचे रक्षण करणाऱ्या शिरूर पोलीस ठाण्याच्या आवारातच सोमवारी (ता. १३) मध्यरात्री गोंधळ, दगडफेक आणि मारामारीचे थरारक चित्र घडले असल्यामुळे शिरूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. पोलीस स्टेशनच्या आवारातच दोन गट आमनेसामने येत एकमेकांवर हल्ले करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असून, यामुळे कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच ठाणे अंमलदार कक्षातील काही वस्तूंची तोडफोड झाल्याची खात्रीलायक सूत्रांनी माहिती दिली आहे.




शिरूर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार, सोमवारी (ता. १३) मध्यरात्रीच्या दरम्यान शिरूर पोलीस स्टेशनच्या आवारात आणि पुणे अहिल्यानगर महामार्गावरील पंचायत समिती कार्यालयासमोर हा संपूर्ण प्रकार घडला असून, सुरुवातीला तक्रार नोंदविण्यासाठी आलेल्या दोन्ही गटांमध्ये वादावादी सुरू झाली. काही वेळातच हा वाद उग्र रूप धारण करत मोठ्या जमावात परिवर्तित झाला. सुमारे ३५ ते ४० जणांचा जमाव एकत्र येऊन एकमेकांवर दगडफेक आणि मारहाण करू लागला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार सतीश मुंडे, उमेश भगत व सहकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, जमाव ऐकण्याच्या मनःस्थितीत नसल्याने परिस्थिती आणखी चिघळली. अखेर वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले. पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सौम्य बळाचा वापर करत परिस्थिती नियंत्रणात आणली. या दगडफेकीत गणेश भोसले व राजू शेवाळे जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी हरीश रवींद्र राजपूत, राजू शेवाळे, गणेश भोसले, विनोद जाधव, सलमान शेख, हाफीज शेख, कलिम सय्यद, कय्यूम सय्यद, तेजस जाधव, हबीब सय्यद, तरबेज, काळू बोरगे (सर्व रा. शिरूर) यांसह जवळपास ४० ते५० जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलीस स्टेशनच्या आवारातच अशा प्रकारे कायद्याचा भंग होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस स्टेशनमध्येच सुरक्षितता नसेल तर सामान्य नागरिकांनी कुठे जावे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहन चोरी, चैन स्नॅचिंग, विद्युत रोहित्र चोरी, शेतकऱ्यांच्या केबल, विद्युत मोटारी, अवैध शस्त्र बाळगणे, अवैध धंदे, अमली पदार्थ विक्री या घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. शिरूर तालुक्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून पोलिसांचा धाक कमी होत चालल्याची भावना व्यक्त होत असून, प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे. शिरूर तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असल्याने सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज बुधवारी (ता. १५) पासून आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

### पत्रकारांना माहिती देण्यास टाळाटाळ

या घटनेबाबत पत्रकारांनी अनेक वेळा संपर्क करूनही शिरूर पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याची माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. अनेक गंभीर गुन्ह्यांची माहिती पोलीस देत नाही, असा आरोप होत आहे. अखेर पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले यांना फोन केल्यानंतर ही माहिती प्राप्त झाली.

# पुण्यातील नांदोशी येथे उभारणार लता–आशा मंगेशकर नावाने रुग्णालय

**पुणे, ता. १४ :** नांदोशी येथे उभारण्यात येणाऱ्या लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनच्या रुग्णालयाचे नाव लता मंगेशकर इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेसऐवजी आता लता-आशा मंगेशकर इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस असे करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळातर्फे घेण्यात आला आहे, अशी माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष, पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी दीनानाथ रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर उपस्थित होते.

ख्यातनाम पार्श्वगायिका आशा भोसले यांना रविवारी (दि. १२) देवाज्ञा झाली. त्या पार्श्वभूमीवर लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशन विश्वस्त मंडळाने कार्यक्रमात काही बदल केले आहेत. १६ एप्रिल सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या पूर्वनियोजित कोनशिला समारंभाम ध्ये संकल्प आणि श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात येणार आहे.

## पंडित हृदयनाथ यांची माहिती



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंगेशकर आणि भोसले कुटुंबीय या वेळी उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी दुपारी चार वाजता सांगीतिक कार्यक्रम होणार असून यामध्ये विभावरी जोशी यांचे गायन होणार आहे. त्यानंतर शंतनू गोखले, अमर ओक, पांडुरंग पवार यांच्या वाद्यसंगीताचे सादरीकरण होणार आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उपचारासाठी सध्याची जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे फाउंडेशनतर्फे नांदोशी येथे ४० एकर परिसरात रुग्णालय उभारण्यात येत आहे. यामध्ये एक हजार खाटांचे सर्जिकल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि तितक्याच खाटांचे दुसरे मेडिकल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे. तसेच मंगेशकर कुटुंबाचा संगीत वारसा जतन करणारे संग्रहालय येथे उभारण्यात येणार असल्याचे डॉ. केळकर यांनी सांगितले.

हिंदुस्थान संगीत विश्वातील अजरामर व्यक्तिमत्त्वे असलेल्या लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्या नावाला साजेसे भव्य रुग्णालय उभारणे, हीच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल, अशी भावना पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी या वेळी व्यक्त केली.

> लता मंगेशकर यांनी वडील दीनानाथ मंगेशकर यांच्या नावाने दीनानाथ मंगेशकर रुग्णालय सुरू केले. लता मंगेशकर यांच्या नावाने रुग्णालय असावे यासाठी नांदोशी येथे रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आशा भोसले यांच्या निधनामुळे आता लता-आशा मंगेशकर इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस असे रुग्णालयाचे नामकरण करण्यात आले असून हे रुग्णालय आशिया खंडातील सर्वात मोठे रुग्णालय ठरेल.
> - **पं. हृदयनाथ मंगेशकर,** अध्यक्ष लता मंगेशकर मेडिकल फाऊंडेशन

## बंगालमध्ये आता बॉम्बला मतांनी उत्तर मिळेल

**पश्चिम बंगाल, ता. १४ :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर जोरदार टीका केली. बीरभूम जिल्ह्यातील मयुरेश्वर येथे आयोजित निवडणूक सभेला संबोधित करताना, यावेळी बंगालची जनता बॉम्बच्या राजकारणाला मतांनी उत्तर देईल आणि राज्यात भाजपचे डबल-इंजिन सरकार स्थापन करेल, असा विश्वास अमित शहा यांनी व्यक्त केला. अमित शहा यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर गंभीर आरोप करत म्हटले की, त्या राज्यातील बहुसंख्य समाजाला भयभीत करण्याचा प्रयत्न करत आहेत. ही निवडणूक केवळ सत्तांतरासाठी नसून, पश्चिम बंगालमधून घुसखोरांना पूर्णपणे हाकलून लावण्यासाठी असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. राज्यात मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात मतदान पार पडावे, यासाठी निवडणूक आयोगाने पुरेशा प्रमाणात केंद्रीय सुरक्षा दलांची टीम तैनात केली असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

## संक्षिप्त



### नितीश कुमार यांनी दिला बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

**बिहार, ता. १४ :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राजभवनात जात आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आता, जवळपास दोन दशकांनंतर, भाजपच्या मुख्यमंत्र्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यसभेवर निवड झाल्यानंतर त्यांनी पदाचा राजीनामा दिला नव्हता. त्यामुळे देशात बिहारच्या राजकारणाची चर्चा सुरू होती. आता नितीश कुमार यांनी राजीनामा दिल्याने या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. आता भाजपकडून कोण मुख्यमंत्री होणार, याबाबत चर्चा होत आहेत. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. नितीश कुमार यांनी राजभवनात आपला राजीनामा सादर केला आहे. जवळपास दोन दशकांनंतर बिहारमध्ये आता भाजपकडून बिहारला मुख्यमंत्री देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेली २१ वर्षे बिहारचे राजकारण नितीश कुमार यांच्याभोवती फिरत राहिले आहे. या काळात ते १० वेळा मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी सहा राजकीय दलबदल केले.

### पुण्यातील खराडीत किरकोळ वादातून एकाची हत्या

**पुणे, ता. १४ :** पुणे शहरात किरकोळ वादातून हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच, खराडी परिसरातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. रात्रीच्या वेळी 'आधी कोणी झोपायचे?' या साध्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर खुनात झाले. या घटनेत ५२ वर्षीय पांडुरंग भाऊराव हरवणे या सुरक्षारक्षकाचा जागीच मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे, गुन्हा केल्यानंतर स्वतः आरोपीनेच पोलीस नियंत्रण कक्षाला फोन करून या कृत्याची कबुली दिली. खराडीतील स्वीट इंडिया चौकाजवळील 'स्पॅनोलाइफ' सोसायटीत ही घटना सोमवारी पहाटे अडीचच्या सुमारास घडली. पांडुरंग हरवणे आणि २२ वर्षीय सुदर्शन काळे हे दोघेही याच ठिकाणी सुरक्षारक्षक म्हणून तैनात होते. रात्रपाळीच्या वेळी दोघांनी ३-३ तास झोपण्याचे ठरवले होते. मात्र, त्या दिवशी आधी कोणी विश्रांती घ्यायची, यावरून त्यांच्यात वाद झाला होता. रागाच्या भरात सुदर्शनने पांडुरंग यांचा गमछाने गळा आवळला, ज्यामुळे ते जागीच बेशुद्ध पडले आणि त्यांचा मृत्यू झाला. सध्या पांडुरंग यांचा मुलगा बाळू हरवणे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक पोटे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### पुणे-सोलापूर प्रवास आता विमानाने फक्त ४५ मिनिटांत होणार

**पुणे, ता. १४ :** पुणेकरांच्या हवाई प्रवासाला आता अधिक गती मिळणार आहे. वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून लोहगाव विमानतळावरून आगामी १ मेपासून नव्या १५ उड्डाणांना परवानगी देण्यात आली आहे. या विस्तारामुळे पुण्याहून दररोज ये-जा करणाऱ्या विमानांची संख्या आता २२० वरून २३५ वर पोहोचणार आहे. विशेष म्हणजे, यात सोलापूरसारख्या म हत्त्वाच्या शहराचाही समावेश करण्यात आला आहे.नव्या वेळापत्रकानुसार, पुण्याची कनेक्टिव्हिटी आता केवळ मेट्रो शहरांपुरती मर्यादित न राहता टायर-२ शहरांशीही जोडली जात आहे.पुणे-सोलापूर थेट विमानसेवा सुरु होणार असून स्टार एअर या कंपनीमार्फत ही सेवा पुरवली जाणार आहे. आतापर्यंत पुणे ते सोलापूर हा प्रवास बस किंवा रेल्वेने करण्यासाठी ४ ते ६ तास लागायचे, तोच प्रवास आता विमानाने अवघ्या ४० ते ४५ मिनिटांत पूर्ण होईल. व्यापार आणि वैद्यकीय कारणांसाठी प्रवास करणाऱ्या लोकांसाठी ही सेवा 'गेम चेंजर' ठरणार आहे. सोलापूरसोबतच पुण्याची मंगळुरू (कर्नाटक) आणि बागडोगरा (पश्चिम बंगाल) या शहरांशीही पहिल्यांदाच थेट हवाई जोडणी होणार आहे. या नव्या फेऱ्यांसाठीचे बुकिंग एअरलाईन्सच्या संकेतस्थळांवर लवकरच सुरू होईल.

### लोहगावातील अपघातात प्राध्यापकाचा मृत्यू

**पुणे, ता. १४ :** पुण्यातील लोहगाव परिसरात सोमवारी (१३ एप्रिल) दुपारी उपजिल्हाधिकारी यांच्या बैठकीला जात असताना झालेल्या अपघातात प्राध्यापक ज्ञानेश्वर रोटे (वय ४०) यांचा मृत्यू झाला. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात १ एप्रिलपासून मतदार यादी सखोल पुनर्निरीक्षण मोहीम सुरु केली आहे. यासाठी दुचाकीवरून धानोरी-लोहगाव रस्त्यावरून जात असताना अपघात झाला. लोहगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास स्पार्क स्प्रिंग सोसायटीसमोर त्यांच्या दुचाकीचा तोल जाऊन ती घसरली. यामध्ये ते चेहऱ्यावर पडल्याने गंभीर जखमी झाले आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. रस्त्याने जाणाऱ्या एका तरुणाने त्यांना तातडीने जवळील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.ज्ञानेश्वर रोटे हे मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील रोटेवाडी, रावळगाव येथील होते. त्यांची नुकतीच इंदापूर तालुक्यातील कळंब येथून लोहगाव येथे बदली झाली होती. ते वडगाव शेरी मतदारसंघात बीएलओ म्हणून मतदार यादी दुरुस्तीचे काम करत होते. त्यांना ६ वर्षांचा मुलगा आणि ११ वर्षांची मुलगी आहे.

# इराणला मदत केल्यास चीनवर ५० टक्के आयात शुल्क लावणार; ट्रम्प यांची चीनला धमकी

**नवी दिल्ली, ता. १४ :** इराण बरोबरची चर्चा फिसकटल्यानंतर आता ट्रम्प यांनी इराणला मदत करणाऱ्या देशांनाही धमकावायला सुरुवात केली आहे. इराणला शस्त्रांची किंवा आर्थिक मदत केल्यास ५० टक्के आयात शुल्क लावण्यात येईल, अशी धमकी ट्रम्प यांनी चीनला दिली आहे.



चीनकडून इराणला शस्त्रांची मदत करणारे जहाज रवाना केले गेल्याचे वृत्त अलिकडेच प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर ट्रम्प यांनी ही धमकी दिली आहे. जर अशा प्रकारे चीनने इराणला मदत केल्याचे आम्ही पकडले, तर अमेरिकेत येणाऱ्या चिनी उत्पादनांवर अमेरिकेत ५० टक्के अतिरिक्त आयात शुल्क लावले जाईल. आपण इराणला एक दिवसात संपवू शकतो. एक दिवसात त्यांची उर्जा सामुग्री ताब्यात घेऊ शकतो. उर्जा प्रकल्प, विद्युत प्रकल्प किंवा तसे मोठे प्रकल्पही ताब्यात घेतले जाऊ शकतात, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. चीन इराणला विमानविरोधी शोल्डर मिसाईल देत असल्याचे वृत्त समजले आहे. तशी शक्यता खरी असावे असे आपल्याला वाटत नाही. मात्र खरोखर चीनकडून इराणला अशी मदत केली गेली, तर चिनी उत्पादनांवर अतिरिक्त आयात शुल्क लावले जाईल, असे ते म्हणाले. पण चीनकडून इराणला शस्त्रांची मदत केली जाते आहे किंवा इराणला मदत करण्याचा चीनचा इरादा असल्याचे वृत्त चीनने सपशेल फेटाळून लावले आहे.

ही एक बिनबुडाची बातमी आहे. चीनने नेहमीच लष्करी सामुग्रीच्या निर्यातीबाबत काळजी घेतली आहे आणि जबाबदारीची भूमिका निभावली आहे, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी नियमित पत्रकार परिषदेत सांगितले. दुसरीकडे अमेरिकेने केलेल्या नाकाबंदीला मोडून काढण्यासाठी इराणचे फास्ट अटॅक जहाज पुढे सरकत असल्याचे वृत्त आहे. हे जहाज फार जवळ आले, तर ते नष्ट केले जाईल, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे.

# पुण्यात शुक्रवारपासून एचएसआरपी नंबर प्लेट अनिवार्य!

**पुणे, ता. १४ :** जर तुम्ही अजूनही जुन्याच नंबर प्लेटवर तुमची गाडी फिरवत असाल, तर आता सावधान! सरकारने 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट' (एचएसआरपी) संदर्भात अत्यंत कडक पाऊल उचलले असून यासाठी १७ एप्रिलची 'डेडलाईन' निश्चित केली आहे. पुढच्या शुक्रवारपासून ज्या गाड्यांना ही विशेष नंबर प्लेट नसेल, त्यांच्यावर आरटीओ आणि वाहतूक पोलीस दंडाचा बडगा उगारणार आहेत.

**दंडच नाही, तर कामेही रखडणार**

जर तुमच्या गाडीला एचएसआरपीनसेल, तर तुम्हाला (प्रदूषण प्रमाणपत्र) दिले जाणार नाही. याचाच अर्थ, विमा नूतनीकरण, आरटीओची कागदपत्रे पडताळणी किंवा जुनी गाडी विकणे यांसारखी महत्त्वाची कामे पूर्णपणे ठप्प होतील. विना नंबर प्लेट फिरणाऱ्या वाहनांना ५००० ते १०,००० रुपयांपर्यंतचा मोठा दंड भरावा लागू शकतो. या प्लेटवर लेझरने कोरलेला एक विशिष्ट कोड आणि क्रोमियम होलोग्राम असतो, जो सहज काढता येत नाही. यामुळे गाडी चोरीला गेल्यास किंवा गुन्ह्यात वापरल्यास ती ट्रॅक करणे सोपे जाते.

**घरबसल्या असा करा अर्ज**

शेवटच्या क्षणाची धावपळ टाळण्यासाठी तुम्ही परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://transport.maharashtra.gov.in) जाऊन ऑनलाईन नोंदणी करू शकता. तिथे तुमच्या वाहनाचा तपशील भरल्यानंतर तुम्हाला एक वेळ आणि तारीख दिली जाईल, ज्या दिवशी जाऊन तुम्ही ही प्लेट बसवून घेऊ शकता.

# पुण्यात सीए ललित पोफळे यांच्या घरी ईडीचा छापा

**पुणे, ता. १४ :** नाशिकमध्ये अंमलबजावणी संचालनालय आणि आयकर विभागाने सोमवारी पहाटेपासून संयुक्त कारवाई करत अशोक खरात यांच्या निवासस्थानी छापा टाकला. कर्मयोगी नगर येथील तृप्तबाला बंगल्यावर सकाळी सुमारे ६ वाजल्यापासून झडती सुरू असून ७ अधिकाऱ्यांचे पथक तपास करत आहे. या कारवाईत अशोक खरात यांच्या कथित बेनामी मालमत्ता आणि आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे तपासली जात आहेत. गेल्या १२ तासांपासून झाडाझडती सुरू असून विविध कागदपत्रांची छाननी करण्यात येत असल्याची माहिती आहे. याचबरोबर पुण्यातही संबंधित ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. पुण्यात सकाळी सुमारे ७ वाजल्यापासून ३ ठिकाणी कारवाई करण्यात आली. खरात यांच्याशी संबंधित ट्रस्टचे माजी विश्वस्त असलेले सीए ललित पोफळे यांच्या निवासस्थानी ईडीने धाड टाकली. त्यांच्या आर्थिक व्यवहारांबाबत तपास सुरू असून कागदपत्रांची चौकशी करण्यात येत आहे.




दरम्यान, शिर्डी पोलिसांनी प्रतिभा चाकणकर यांची सुमारे ८ तास चौकशी केली. समता पतसंस्थेतील खात्यांबाबत त्यांचा आणि त्यांच्या मुलगा चिन्मय यांचा जबाब नोंदवण्यात आला. तपासात त्यांच्या नावावर २ आणि मुलाच्या नावावर २ खाती असल्याची माहिती समोर आली आहे. या खात्यांवरून २ कोटी ४० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

याशिवाय, समता पतसंस्थेच्या राहाता शाखेतही ईडीने छापा टाकला आहे. या पतसंस्थेत अशोक खरात नॉमिनी असलेली सुमारे १०० खाती असून त्यावरून ६० कोटींहून अधिक व्यवहार झाल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# पोलिसांच्या चकमकीत एन्काऊंटर झालेल्या लखन भोसलेच्या साथीदाराचा जामीन मंजूर

**शिक्रापूर, ता. १४ :** सातारा पोलिसांच्या चकमकीत शिक्रापूर हद्दीत ठार झालेल्या लखन भोसले प्रकरणातील आरोपीचा साथीदार अमर धुळप्पा केरे याला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने ३० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर हा जामीन मंजूर केला असून, शिरूर सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. पी. पोळ यांनी हा आदेश दिला आहे. अशी माहिती ॲड. सर्वेश निकम व ॲड. हर्षवर्धन दरेकर यांनी दिली.



साताऱ्यात २८ ऑगस्ट २०२५ रोजी एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लुटण्याची घटना घडली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असताना आरोपी लखन पोपट भोसले व अमर धुळप्पा केरे हे शिक्रापूर परिसरात लपल्याची माहिती सातारा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार विशेष पथकाने शिक्रापूर येथे सापळा रचून कारवाई केली.

या कारवाईदरम्यान अमर केरे याला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार मुख्य आरोपी लखन भोसले याचा शोध घेण्यात आला. सायंकाळच्या सुमारास लखन भोसले समोर आल्यानंतर पोलिसांनी त्याला शरण येण्याचे आवाहन केले. मात्र, त्याने धारदार सुरा काढून पोलिसांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात पोलीस कर्मचारी जखमी झाले.

स्वसंरक्षणार्थ पोलिसांनी गोळीबार केल्याने लखन भोसले गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर लखन भोसले व अमर केरे यांच्याविरोधात शासकीय कामात अडथळा, जीवघेणा हल्ला यांसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, आरोपी अमर केरे याने ॲड. सर्वेश निकम व ॲड. हर्षवर्धन दरेकर यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात त्याचा थेट सहभाग नसून त्याला खोट्या पद्धतीने अडकवण्यात आल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाकडून करण्यात आला. हा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने त्याला ३० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे.

# नोकरीच्या नावाखाली सुशिक्षित तरुणांची १८ लाखांची फसवणूक

**बीड, ता. १४ :** शिक्षक भरती प्रक्रियेत गैरप्रकारांच्या घटना सातत्याने समोर येत असताना बीड जिल्ह्यात आणखी एक फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. पाथर्डी तालुक्यात शिक्षक पदावर नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका दांपत्याची मोठी आर्थिक फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रुपेशकुमार राम बागडे (वय ३९) यांच्याशी त्यांच्या ओळखीतील सुभाष खेडकर याने २०२२ साली संपर्क साधला होता. जालना येथील एका शिक्षण संस्थेशी संबंधित प्राथमिक शाळेत शिक्षक पदाच्या जागा उपलब्ध असल्याचे सांगून त्याने नोकरीची हमी दिली. त्यासाठी मोठी रक्कम द्यावी लागेल, असेही सांगण्यात आले.

यानंतर खेडकर याने संस्थेशी संबंधित असल्याचे सांगितलेल्या आणखी एका व्यक्तीशी बागडे यांची भेट घडवून आणली. दोघांनी मिळून नोकरी निश्चित असल्याचा विश्वास निर्माण केला. या विश्वासावर बागडे यांनी वेळोवेळी रोख, आरटीजीएस आणि ऑनलाईन व्यवहाराद्वारे पैसे दिले. ही रक्कम सुमारे १८ लाख ५० हजारांपर्यंत पोहोचली.

नोकरी खरी वाटावी म्हणून दांपत्याला बनावट नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यावर विश्वास ठेवून बागडे व त्यांच्या पत्नीने काही काळ संबंधित शाळेत कामही केले. मात्र त्यांना कोणताही पगार मिळाला नाही. यामुळे संशय निर्माण झाल्याने त्यांनी चौकशी केली असता, संबंधित शाळेची मान्यता शासनाने आधीच रद्द केल्याचे समोर आले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर बागडे यांनी आरोपींकडे पैसे परत मागितले, मात्र प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# जमिनीच्या वादातून भावकीत राडा; पोलिस ठाण्यात ८ जणांवर परस्परविरोधी गुन्हे

**उरुळी कांचन, ता. १४ :** जमिनीच्या वाटपावरून आणि बांधावरील झाडांच्या जुन्या वादावरून वळती (ता. हवेली) गावच्या हद्दीतील 'वरचा मळा' परिसरात दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली. या हाणामारीत महिलांनाही मारहाण करण्यात आली असून, उरुळी कांचन पोलिसांनी विनयभंग, मारहाण आणि जीवे मारण्याची धम की दिल्याप्रकरणी दोन्ही गटांतील ८ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

पहिल्या घटनेत महिलेने उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अरविंद मच्छिंद्र कुंजीर, जाउ वैषाली अरविंद कुंजीर, सृष्टी अरविंद कुंजीर सर्व (रा. वळती, वरचा मळा ता. हवेली) व अजित भिसे (रा. कासुर्डी ता. दौंड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत अरविंद मच्छींद्र कुंजीर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार संभाजी एकनाथ कुंजीर, (वय ४२) शैला संभाजी कुंजीर, (वय -३६ वर्ष दोन्ही रा. वळती ता. हवेली), दिनेश शांताराम म्हस्के, (वय -३४), उमेश शांताराम म्हस्के (वर्ष ३५, दोन्ही रा. डाळींब, ता. दौंड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत फिर्यादी महिला शनिवारी (ता. ११) सायंकाळी आणि रविवारी (ता. १२) दुपारी आपल्या शेतातील विहिरीवर असताना, त्यांच्या भावकीतील चुलत दीर अरविंद मच्छिंद्र कुंजीर, जाऊ वैशाली अरविंद कुंजीर




आणि पुतणी सृष्टी अरविंद कुंजीर यांनी जमिनीच्या वाटपावरून वाद उकरून काढला. यावेळी जाऊ आणि पुतणीने अश्लील शिवीगाळ करत दमदाटी केली. वाद विकोपाला गेल्यावर चुलत दीर अरविंद कुंजीर याने फिर्यादी महिलेला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, महिलेची गचूंडी धरून तिला खाली पाडले आणि विनयभंग होईल असे वर्तन केले. त्यानंतर लाकडी काठीने जबर मारहाण केली. पीडित महिला तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्याकडे जात असताना, आरोपीचा भाचा अजित भिसे (रा. कासुर्डी, ता. दौंड) याने तुम्ही केस केली तर तुमचे हातपाय तोडीन, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून उरुळी कांचन पोलिसांनी वरील चौघांवर विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार गायकवाड करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत फिर्यादी अरविंद कुंजीर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, रविवारी (ता. १२) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आपल्या शेतातील गट नं. ३२८ मध्ये मिरच्यांच्या रोपांना पाणी देत होते. यावेळी पूर्वी तोडलेल्या बांधावरील झाडांच्या कारणावरून त्यांच्याच भावकीतील संभाजी कुंजीर आणि शैला कुंजीर यांनी वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की, आरोपींनी आपल्यासोबत आणलेल्या घातक शस्त्रांनी अरविंद यांच्यावर हल्ला चढवला. आरोपींनी हातातील कोयता, लोखंडी गज, विळा आणि स्क्रूड्रायवरने अरविंद यांच्या नाकावर, छातीवर, हातावर आणि कंबरेवर सपासप वार केले. या हल्ल्यात अरविंद गंभीर जखमी झाले आहेत. मारहाण करताना आरोपींनी त्यांना अश्लील शिवीगाळ करून तुला जिवे ठार मारतो अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, कुंजीर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वरील चौघांवर उरुळी कांचन पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस प्रशांत पवार करीत आहेत.

# त्याला शिक्षा व्हायला नको खरातच्या सासूचे अजब विधान



**नाशिक, ता. १४ :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याला न्यायालयाने १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आज त्याला चौथ्या गुन्ह्याच्या प्रकरणात नाशिक सत्र न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले होते. या सुनावणीनंतर प्रकरणाला अधिक वेग आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, अशोक खरातची सासू आणि कल्पना खरातची आई पार्वती शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधताना काही महत्त्वाची माहिती दिली. त्या म्हणाल्या की, त्या गेल्या १ महिन्यापासून येथे आहेत, मात्र चौकशीबाबत त्यांना कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही. कल्पना नेमकी कुठे आहे हेही त्यांना माहीत नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच तिच्याशी फोनवरही संपर्क झालेला नसल्याने त्या चिंतेत असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

पार्वती शिंदे यांनी सांगितले की, पोलिसांकडून कुटुंबीयांची चौकशी सुरू आहे, मात्र त्यांची स्वतःची चौकशी अद्याप झालेली नाही. त्या स्वतः अशिक्षित असल्यामुळे त्यांना नीट बोलता येत नाही आणि या प्रकरणाची सविस्तर माहितीही नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. अशोक खरात नेमके काय करत होता याबाबतही त्यांना काहीच माहिती नव्हती. तो ऑफिसला जात असे, पण तिथे काय घडत होते याची माहिती ना त्यांना होती ना त्यांच्या मुलीला, असेही त्यांनी सांगितले.

अशोक खरातला शिक्षा व्हावी का, असा प्रश्न विचारल्यावर त्यांनी स्पष्ट उत्तर देण्यास टाळाटाळ केली. शिक्षा व्हायला नको असे त्यांनी म्हटले, मात्र सध्याच्या परिस्थितीत त्याला मदत कोण करणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. या संपूर्ण प्रकरणामुळे कुटुंबीयांवर मोठा मानसिक ताण असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# चैत्यभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दादर, ता. १४ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव दिनानिमित्य दादरच्या चैत्यभूमीवर मध्यरात्रीपासूनच अनुयायांचा उत्साह ओसांडून वाहत आहे. चैत्यभूमी, दीक्षा भूमीवर अनुयायांची अलोट गर्दी झाली आहे.

दादर येथील चैत्यभूमीवर राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक दृष्टीकोनाचा देखील उल्लेख केला.



भारतात एक सेंट्रल बँक असली पाहिजे, असं बाबासाहेब यांनी सांगितलं होते. आपल्या चलनाच सिल्वर कोट संपवून गोल्डन कोट सुरु केलं पाहिजे, म्हणून रिझर्व्ह बँक स्थापन झाली. याची मुळ कल्पना ही बाबासाहेब यांची होती. १९२३ मध्ये त्यांनी मांडलेले आर्थिक तत्त्वज्ञान पुढे जगाने स्वीकारले आणि अनेक वर्षे तेच मॉडेल प्रभावी ठरले, असं गौरवउद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

अमेरिकेसारख्या देशांनी डॉलर केंद्रित अर्थव्यवस्था स्वीकारून गोल्ड बॅकिंग कमी केले. मात्र सध्याच्या बदलत्या जागतिक परिस्थितीत पुन्हा एकदा अमेरिका आणि चीनसारख्या देशांकडून सोन्याच्या साठ्याला महत्त्व दिले जात आहे. जगभरात सोन्याची खरेदी वाढत आहे, यावरून डॉ. आंबेडकरांचे विचार किती दूरदर्शी होते, हे स्पष्ट होते, असेही फडणविसांनी जागतिक चलनव्यवस्थेतील बदलांवर भाष्य करताना सांगितले.

**संविधान हे आपल्या देशाचा पाया : एकनाथ शिंदे**

तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलताना सांगितलं की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे निर्माते होते, तसेच ते माणुसकीचेही निर्माते होते. बाबासाहेबांनी त्यांचे ज्ञान स्वत:साठी न वापरता शोषित, वंचित, दीन दलितांच्या उद्धारासाठी वापरलंय. संविधान हे आपल्या देशाचा पाया आहे. आज एक सर्वसामान्य व्यक्ती देशाच्या उच्च स्थानी विराजमान होतो.

आम्ही इथे बसलो ते संविधानाची शपथ घेऊन बसलो. आमच्या सुनेत्राताई उपमुख्यमंत्री होतात. ही संविधानाची देणं आहे. अदिवासी महिला राष्ट्रपती होतात, आणि मी शेतकरी कुटुंबातला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री झालो ते बाबासाहेब यांच्यामुळे भिमाची लाडकी लेक ज्योती वाघमारे संसदेत पोहचली, बाबासाहेबांचा विचार हाच आमच्या सरकारचा डीएनए आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# जिल्हा परिषदांमध्ये स्वीकृत सदस्यांची नियुक्ती पुन्हा सुरू

**पुणे, ता. १४ :** महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याचा मार्ग तब्बल ३४ वर्षांनंतर मोकळा झाला आहे. राज्य सरकारने यासंदर्भातील सुधारणा विधेयक २०२६ मंजूर केले असून सध्या ते राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठवण्यात आले आहे. सन १९९२ मध्ये झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर ही पद्धत बंद करण्यात आली होती. मात्र ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही पद्धत पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता महानगरपालिका आणि नगरपालिकांप्रमाणेच जिल्हा परिषदांमध्येही तज्ज्ञ किंवा अनुभवी व्यक्तींची नियुक्ती करणे शक्य होणार आहे.



या नवीन निर्णयामुळे राजकीय क्षेत्रात मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विशेषतः निवडणुकीत अगदी थोड्या मतांनी पराभूत झालेल्या उमेदवारांना किंवा पक्षासाठी अनेक वर्षे काम करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांना या माध्यमातून सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. मात्र सध्या या प्रक्रियेला थोडा विलंब होताना दिसत आहे. राज्यपालांची स्वाक्षरी झाल्यानंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल आणि त्यानंतर ग्राम विकास विभागाला या नियुक्तीसाठी सविस्तर नियमावली तयार करावी लागणार आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी किमान २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागू शकतो असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

नियमावली अधिकृतपणे जाहीर झाल्यानंतरच प्रत्यक्ष नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे. ज्या १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुका आधीच पार पडल्या आहेत, तिथे ही प्रक्रिया प्रथम राबवली जाण्याची शक्यता आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये आगामी निवडणुका झाल्यानंतर ही तरतूद लागू केली जाईल असे प्रशासकीय सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान या पदावर आपली वर्णी लागावी यासाठी अनेक इच्छुक उमेदवारांनी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन स्वतःचे नाव सुचवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मात्र नियुक्ती प्रक्रियेला वेळ लागत असल्याने इच्छुकांमध्ये काही प्रमाणात अस्वस्थता पाहायला मिळत आहे. या निर्णयामुळे ग्रामीण राजकारणाला एक नवी दिशा मिळण्याची चिन्हे आहेत.

# फुरसुंगीत वॉचमनवर लोखंडी सळईने जीवघेणा हल्ला; दोघांवर गुन्हा

**फुरसुंगी, ता. १४ :** शेजारील बांधकामाच्या किरकोळ वादाने अचानक हिंसक वळण घेतल्याची धक्कादायक घटना फुरसुंगी (ता. हवेली) परिसरात शनिवारी (ता. ११) सकाळी साडेनऊ वाजण्याच्या घडली आहे.आम्ही दोन फुट सोडलं, तूही सोड असे म्हणताच फुरसुंगीत वॉचमनवर लोखंडी सळईने जीवघेणा हल्ला केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तर पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुभम नेटके(वय २४) व त्याचा साथीदार शंभु हंबीर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी दिनेश शंकरराव वाळंजकर (वय ५०,आशीर्वाद नगर, फुरसुंगी) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी वाळंजकर हे कुटुंबासह फुरसुंगीतील आशीर्वाद नगर येथे राहतात व वॉचमन म्हणून काम करतात. त्यांच्या शेजारी राहणारा शुभम नेटके याच्या घराचे बांधकाम सुरू असून, त्यातूनच हा वाद उफाळून आला.




वाळंजकर यांनी शुभम नेटके याला बांधकाम करताना दोन फुट जागा सोडण्यास सांगितले. तसेच घरासमोर पडलेले सिमेंट हटवण्याबाबतही सांगितले. या कारणावरून संतापलेल्या शुभमने शिवीगाळ करत वाळंजकर यांच्यावर अचानक हल्ला चढवला. वाद वाढताच शुभमने जवळच पडलेली लोखंडी सळई उचलून वाळंजकर यांच्या हनुवटीवर जोरदार वार केला. तसेच छाती व पायावरही मारहाण करून त्यांना जखमी केले. वाद सोडवण्यासाठी आलेल्या त्यांच्या पत्नी वैशाली व मुलगा पियुष यांनाही शिवीगाळ करण्यात आली.

या घटनेनंतर जखमी अवस्थेत तक्रार देण्यासाठी जात असताना आरोपी शुभम नेटके हा त्याचा मित्र शंभु हंबीर याला घेऊन पुन्हा समोर आला. दोघांनी मिळून वाळंजकर कुटुंबीयांना शिवीगाळ करत मारहाणीची धमकी दिली. यानंतर जखमी वाळंजकर यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर त्यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपी शुभम नेटके व त्याचा साथीदार शंभु हंबीर यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११५(२), ११८(१), ३(५), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## केसांना किती वेळ मालिश करणे गरजेचे असते, मालिश करताना मेथी दाण्याचा उपयोग कसा करावा?

आपले केस हे आपल्या सौंदर्याचा आरसा असतात. त्यामुळेच केसांना नियमित मालिश करणे देखील खूप गरजेचे असते. केसांना मालिश केल्यामुळे केसांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. काळ्याभोर लांबसडक केसांसाठी आपल्या डोक्याला नियमितपणे मालिश करणे खूप गरजेचे आहे.

नैसर्गिक आणि आयुर्वेदिक औषधी वनस्पतींपासून तयार केलेले तेल केसांना लावण्याचेही अनेक फायदे आहेत. मेथीचे दाणे आणि नारळाचे तेल हे मिश्रण केसांमध्ये जादुई फरक आणते आणि केसांना आणि टाळूला पोषण देते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मेथी आणि खोबरेल तेल केसांना लावल्याने केसांची वाढ वाढते. यामुळे केस लांबसडक आणि सुंदर होतात, तसेच केसांना खोबरेल तेल-मेथी लावण्याचे काय फायदे आहेत ते

केस अकाली पांढरे होण्याच्या समस्येपासून रोखण्यासाठी, नारळाचे तेल आणि मेथीच्या दाण्यांपासून बनवलेले हे हर्बल तेल तुमच्या केसांना लावू शकता. केसांची ताकद वाढवण्यासोबतच, ते केसांना अकाली पांढरे होण्यापासून देखील रोखते.

केसांमधील कोंड्याची समस्या कमी करण्यासाठी मेथी प्रभावी आहे. यासोबतच मेथी केसांची चमक वाढवण्यासही मदत करते.

२ चमचे मेथीचे दाणे आणि मूठभर कढीपत्ता १०० मिली नारळाच्या तेलात १०-१५ मिनिटे उकळवा. नंतर हे तेल थंड होऊ द्या. थंड झाल्यावर तेल गाळून बाटलीत भरा. शॅम्पू करण्यापूर्वी तुम्ही हे तेल तुमच्या टाळूला मसाज करण्यासाठी वापरू शकता. केसांचा कोरडेपणा कमी करण्यासाठी, नारळाचे तेल आणि मेथीच्या दाण्यांपासून बनवलेले हे तेल लावू शकता. हे तुमच्या टाळूला देखील पोषण देते. पोषण मिळाल्याने केस मऊ आणि रेशमी होतात आणि केसांची ताकदही वाढते.

नारळाच्या तेलात लॉरिक ॲसिड असते हे केसांच्या मुळांसाठी खूप गरजेचे आहे. त्याचप्रमाणे मेथीमध्ये आढळणारे प्रथिने आणि निकोटिनिक ॲसिड सारखे घटक केसांची वाढ वाढवतात. यामुळे केसांची लांबी वाढते.

# शिरूर येथील आनंद नागरी पतसंस्थेत कोट्यवधींची आर्थिक फसवणूक

## आठ जण अटकेत तर मोठा मासा अजूनही फरार

**योगेश मारणे**

शिरूर, ता. १४ : शिरूर शहर व परिसरात मोठी खळबळ उडवून देणाऱ्या आनंद नागरी पतसंस्थेच्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात शिरूर पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल आरोपींना अटक केली आहे. ठेवीदारांच्या पैशांचा अपहार, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि विश्वासघात केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून, अटकेत घेतलेल्या आरोपींमध्ये शहरातील काही प्रतिष्ठित व्यापारी व व्यक्तींचा समावेश असल्याने व्यापारी वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणातील प्रमुख सूत्रधार मात्र अद्याप फरार असून, मोठा मासा पोलिसांच्या जाळ्यात कधी अडकणार? अशी चर्चा सध्या शिरूर शहरात रंगत आहे. याबाबत अपर विशेष लेखापरीक्षक (वर्ग-२) सहकारी संस्था, पुणे येथील संजयकुमार सखाराम पुंडे (वय ५६) यांनी फिर्याद दिली आहे.




त्यांच्या पुरवणी जबाबानुसार आणि तपासातून उघड झालेल्या पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये विनयकुमार वसंतलाल संघवी (वय-४८, रा. आनंद सोसायटी, शिरूर), भरतकुमार रतनलाल चोरडिया (वय ५६), मनोज पोपटराव मुसुडगे (वय-५०), वल्लभ मनसुखलाल साखला (वय-३८), सुरेशकुमार शांतीलाल बोरा (वय-७१), कांतीलाल बाळासो होळकर (वय-६५, रा. सादलगाव, ता. शिरूर) तसेच दोन महिलांचा समावेश आहे. प्राथमिक तपासानुसार, शिरूर येथील आनंद नागरिक सहकारी पतसंस्थामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाला असून, ठेवीदारांच्या कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याचे उघड झाले आहे. या संदर्भात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० नुसार फसवणूक, विश्वासघात, बनावट कागदपत्रे बनवणे, गुन्हेगारी कट रचणे या अंतर्गत विविध प्रकारचे गुन्हे शिरूर पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आले आहेत.

दरम्यान, या कारवाईमुळे शिरूर तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून, ठेवीदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. फरार मुख्य आरोपीच्या शोधासाठी पोलिसांनी विशेष पथक नेमले असून, लवकरच या गैरव्यवहारातील मुख्य आरोपींनाही अटक करण्यात येईल. असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## टोळक्याकडून पोलीस शिपायाला धक्काबुक्की

**पुणे, ता. १४ :** रस्त्यावर फटाके फोडण्यास मज्जाव करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला टोळक्याने धक्काबुक्की केल्याची घटना अरण्येश्वर परिसरात घडली. या प्रकरणी पर्वती पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस शिपाई राहुल उन्हाळे यांनी पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास आरोपींनी अरण्येश्वर परिसरात फटाके फोडले. रात्रपाळीत गस्त घालणारे पोलीस शिपाई उन्हाळे यांनी त्यांना हटकले. रस्त्यात फटाके फोडू नका, तसेच मधोमध लावलेली दुचाकी बाजूला काढा, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर आरोपींनी उन्हाळे यांनाधक्काबुक्कीकेली. झटापटीतउन्हाळे यांचा गणवेश फाटला. शासकीय कामात अडथळा आणणे, धक्काबुक्की केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक एस. बी. कोपनर तपास करत आहेत.

# अल्पवयीन मुलींचे व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या अयानला अखेर अटक

**अमरावती, ता. १४ :** अमरावती जिल्ह्यातील परतवाडा परिसरातून एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अल्पवयीन मुलींशी मैत्री करून त्यांचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ तयार करून ते प्रसारित करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. अयान अहमद तन्वीर अहमद असे या आरोपीचे नाव असून, त्याच्या या कृत्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी पोक्सो आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेली माहिती अशी की, परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत




काही मुलींचे आणि एका तरुणाचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलीस अधीक्षक कार्यालयाने या घटनेचा तपास केला असता धक्कादायक वास्तव समोर आले. आरोपी अयान याने सोशल मीडियाच्या मदतीने अनेक मुलींशी ओळख वाढवली होती. त्यानंतर त्याने या मुलींना आपल्या जाळ्यात ओढून त्यांच्या इच्छेविरुद्ध अश्लील चित्रीकरण केले. हे फोटो आणि व्हिडिओ त्याने सोशल मीडियावर टाकून संबंधित मुलींची बदनामी करण्याचा प्रयत्न केला.

प्राथमिक तपासात या सर्व पीडित मुली अल्पवयीन असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात सुमारे १८० हून अधिक मुलींचे व्हिडिओ प्रसारित करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, ज्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य प्रचंड वाढले आहे. पोलीस अंमलदार निलेश काळे यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपीला तातडीने ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी त्याचा मोबाईल फोन जप्त केला असून त्यामध्ये नेमके किती आणि कोणाचे व्हिडिओ आहेत, याचा सविस्तर तपास आता सायबर सेलच्या मदतीने केला जात आहे.

सध्याच्या काळात तरुण पिढी सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर करत आहे, मात्र त्याचा असा चुकीचा वापर करून मुलींची फसवणूक होण्याचे प्रमाण वाढले आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या मोबाईल वापराकडे आणि त्यांच्या मित्रमैत्रिणींकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. या घटनेमुळे अमरावती जिल्ह्यात भीतीचे वातावरण असून पोलिसांनी अशा प्रवृत्तींविरुद्ध कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले जाणार असून पोलीस या प्रकरणातील अधिक दुवे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

## दौंडमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; पाच जण ताब्यात

**दौंड, ता. १४ :** दौंड शहरात बेकायदेशीर जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धडक कारवाई करत पाच जणांना रंगेहात पकडल्याने खळबळ उडाली आहे. ख्रिश्चन कॉलनी परिसरातील एका बंद घराच्या आडोशाला सुरू असलेल्या रम्मी जुगारावर ही कारवाई १३ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास करण्यात आली आहे.

जॉन ॲन्थोनी फिलीफ (५४), कमलेश सुरेश बेहरानी (५२), विजय सुशील श्रीसुंदर (४५), मॅन्युअल डरेल डीकोस्टा (४५) आणि संजय भिमराव बारावकर (५८) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार असिफ नबीलाल शेख यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बंगलासाईट, ख्रिश्चन




कॉलनी येथे हिरव्या नेटच्या आडोशात जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी छापा टाकत पाच जणांना ताब्यात घेतले. हे सर्वजण पैशांवर रम्मी हा जुगार खेळत असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ८ हजार ७६० रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सय्यद करत आहेत.



## टिळेकरवाडीत डॉ. आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**उरुळी कांचन, ता. १४ :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (ता. १४) ग्रामपंचायत टिळेकरवाडी आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच गोवर्धन टिळेकर हे होते. यावेळी उपसरपंच कल्पना टिळेकर, माजी सरपंच सुभाष लोणकर, महात्मा गांधी विद्यालय सर्वोदय संघाचे विश्वस्त राजेंद्र टिळेकर, शाळेच्या मुख्याध्यपिका सुवर्णा वडावराव, अंगणवाडी सेविका अलका भालेराव, मदतनीस अर्चना भालेराव, ग्रामस्थ अविनाश टिळेकर, राजेंद्र टिळेकर, सचिन सोनवणे, राजश्री सोनवणे, ग्रामपंचायत कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.


कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षावर आणि त्यांच्या शैक्षणिक कार्यावर अत्यंत प्रभावी भाषणे केली. उपस्थित मान्यवरांनीही आपल्या मनोगतातून बाबासाहेबांच्या विचारांचा अवलंब करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

दरम्यान, कार्यक्रमाचे नियोजन ग्रामपंचायत प्रशासन आणि शाळा व्यवस्थापन समितीने मिळून केले होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर आणि पालकांचे ग्रामपंचायतीच्या वतीने आभार मानण्यात आले.

## पुणे पोलिसांना आता हेल्मेट सक्ती

**पुणे, ता. १४ :** राज्यात दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट सक्तीचा नियम आधीपासून असला तरी आता त्याची अंमलबजावणी अधिक कडक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांनाही हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य डीजीपी कार्यालयाने नुकतेच यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून सर्व पोलीस आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी दुचाकीवर प्रवास करताना हेल्मेट घालावे, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

पुणे शहरात या नियमाची अंमलबजावणी विशेष लक्ष केंद्रित करून केली जाणार आहे. हिम्मत जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे. कोणताही पोलीस कर्मचारी हेल्मेटशिवाय वाहन चालवताना आढळल्यास त्याच्यावर दंडात्मक



कारवाई केली जाणार आहे. तसेच नागरिकांनीही अशा प्रकरणांची माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यासाठी पुणे वाहतूक पोलिसांनी नागरिकांना पीटीपी पचा वापर करण्यास सांगितले आहे. हेल्मेट न घातलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा फोटो काढून, संबंधित वाहनाचा क्रमांक नोंदवून तो ॲपवर अपलोड करता येणार आहे. त्यानुसार संबंधितांवर कारवाई केली जाईल.

मागील १ वर्षात राज्यात रस्ते अपघातांमध्ये १५००० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला असून त्यापैकी सुमारे ७००० मृत्यू दुचाकीस्वारांचे आहेत. पुण्यासह मुंबई आणि नागपूर वगळता इतर भागात केवळ २० टक्के लोक हेल्मेट वापरत असल्याचे समोर आले आहे. ही चिंताजनक बाब लक्षात घेऊन पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. वाहतूक कायद्यातील कलम १९४ डीनुसार हेल्मेट न घातल्यास ५०० रुपये दंड आकारला जाणार आहे. तसेच नियम मोडणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात केली जाणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे पुण्यात आता पोलिसांनी स्वतः आदर्श ठेवत नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे.

## पुणे ते गाझीपूर विशेष रेल्वे एक मे पासून धावणार

**पुणे, ता. १४ :** उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर उत्तर भारतात जाणाऱ्या प्रवाशांसाठी रेल्वे प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. पुणे विभागातून गाझीपूर सिटीसाठी विशेष द्विसाप्ताहिक रेल्वे सुरू करण्यात येणार आहे. १ मेपासून पुणे-गाझीपूर सिटी-हडपसर विशेष रेल्वे धावणार असून, त्यामुळे प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०१४३१ ही पुणे-गाझीपूर सिटी विशेष रेल्वे १ मे ते १४ जुलैदरम्यान चालवली जाणार आहे. ही रेल्वे दर मंगळवारी आणि शुक्रवारी पुणे स्थानकातून सकाळी ६.४० वाजता सुटेल. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ७.०५ वाजता ती गाझीपूर सिटी



येथे पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०१४३२ ही गाझीपूर सिटी-हडपसर विशेष रेल्वे ३ मे ते १६ जुलैदरम्यान धावणार आहे. ही रेल्वे दर गुरुवारी आणि रविवारी गाझीपूर सिटी येथून पहाटे ४.२० वाजता सुटेल. त्यानंतर दुसऱ्या दिवशी हडपसर स्थानकात पोहोचेल. विशेष म्हणजे, पुण्यातून सुटणारी ही रेल्वे परतीच्या प्रवासात थेट हडपसरपर्यंत जाणार आहे.

या विशेष रेल्वेच्या एकूण ४४ फेऱ्या होणार आहेत. उन्हाळी सुट्टीत गावी जाणारे, सहलीसाठी निघालेले तसेच उत्तर प्रदेशकडे जाणारे प्रवासी यांना याचा मोठा फायदा होणार आहे. पुणे आणि परिसरातील अनेक प्रवासी दरवर्षी या काळात उत्तर भारताकडे जात असल्याने रेल्वेने ही अतिरिक्त सेवा उपलब्ध करून दिली आहे. पुणेहून सुटणाऱ्या या विशेष रेल्वेला दौंड, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खंडवा, इटारसी, कटनी, सतना, प्रयागराज आणि वाराणसी येथे थांबा असेल. त्यानंतर गाझीपूर सिटी हा अंतिम थांबा असेल.

## पिंपरी–चिंचवडमधील रुग्णालयात रुग्णाकडून वृद्ध महिलेवर हल्ला

**पिंपरी-चिंचवड, ता. १४ :** पिंपरी-चिंचवड परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली असून रुग्णालयातील आयसीयूमध्येच एका रुग्णाने वृद्ध महिलेवर हल्ला केल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेत ६९ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना १३ एप्रिल रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास औंध येथील जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात घडली. बाबासाहेब शंकर डोंगरे (वय ४२) यांना उपचारासाठी आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. त्याच वॉर्डमध्ये कांता मारुती जाधव (वय ६९) यांच्यावरही उपचार सुरू होते. दरम्यान, वॉर्डमधील दरवाजा बंद केल्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. सुरुवातीला हा वाद शाब्दिक पातळीवर होता. मात्र काही वेळातच परिस्थिती बिघडली आणि आरोपीने संतापाच्या भरात दरवाजाची काच फोडली. त्यानंतर त्याच काचेच्या तुकड्याचा वापर करून महिलेवर हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे.

या हल्ल्यात जाधव यांच्या हाताला दुखापत झाली. घटनेनंतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी तत्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि जखमी महिलेला तातडीने उपचार दिले. या प्रकारामुळे रुग्णालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८ आणि ३२४ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून रुग्णालयातील सुरक्षेच्या मुद्द्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# देवदर्शनाच्या बहाण्याने कागदपत्र घेऊन कोट्यवधींचे व्यवहार केले

## रुपाली चाकणकरांच्या बहिणीचा धक्कादायक दावा

नाशिक, ता. १४ : नाशिकमधील कथित भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात तपासाचा फास अधिक घट्ट होताना दिसत आहे. या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या बहीण प्रतिभा चाकणकर यांची सोमवारी शिर्डी पोलीस ठाण्यात सुमारे आठ तास चौकशी करण्यात आली. यावेळी त्यांचा आणि मुलगा चिन्मय यांचाही जबाब नोंदवण्यात आला.

समता पतसंस्थेतील संशयास्पद व्यवहारांप्रकरणी पोलिसांनी नोटीस बजावल्यानंतर प्रतिभा चाकणकर चौकशीसाठी हजर झाल्या. त्यांच्या आणि कुटुंबीयांच्या नावावर चार खाती उघडण्यात आल्याचे समोर आले



असून त्यातून सुमारे २ कोटी ४० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचा संशय आहे. विशेष म्हणजे या खात्यांमध्ये नॉमिनी म्हणून अशोक खरात यांचे नाव असल्याची माहितीही समोर आली आहे. दरम्यान, चौकशीनंतर प्रतिभा चाकणकर यांनी सर्व आरोप फेटाळले. संबंधित खाती बनावट असून आपण एकही व्यवहार केलेला नाही, तसेच खात्यांवरील सह्या देखील बनावट असल्याचा त्यांनी दावा केला. देवदर्शनाच्या नावाखाली अशोक खरात यांनी कागदपत्रे घेतली आणि त्यांचा गैरवापर करून खाती उघडली असावीत, असा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच, पोलिसांची अधिकृत नोटीस मिळण्यापूर्वीच माध्यमांमधून माहिती मिळाल्यानंतर आपण स्वतःहून पोलिस ठाण्यात येऊन जबाब दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणात त्यांच्या वकील जयश्री काळे-पालवे यांनीही खाती पूर्णपणे बनावट असल्याचा दावा केला. प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलाने कधीही संबंधित पतसंस्थेला भेट दिलेली नाही, तसेच खाते उघडताना चुकीचा पत्ता वापरण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सह्यांचे नमुने पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले असून तपासात पूर्ण सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या सर्व पार्श्वभूमीवर पोलिसांकडून बनावट खाती, आर्थिक व्यवहारांचा स्रोत आणि संबंधित नेटवर्क यांचा सखोल तपास सुरू असून येत्या काळात या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.